महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय
**स्मार्ट सिटी अभियान, अमृत अभियान व स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)**
मित्तल टॉवर, ए विंग, ३ रा मजला, फ्रि प्रेस जरनल मार्ग, नरीमन पॉइंट, मुंबई-४०००२१
दुरध्वनी क्र.०२२ - ६२३७७०३१ ई-मेल: executivedirector.mudm@gmail.com

पत्र क्र.राअस/SMM/सि.को./नियुक्ती /2133 /१७-१८
दिनांक :- ०६/१०/२०१७

प्रति,

श्री. अभिजित संजयकुमार थोरात,
घर नं.७बी.शेरगंगा सोसायटी.पहाडसिंगपुरा.
औरंगाबाद.

विषय - "सिटी को-ऑर्डिनेटर" या कंत्राटी पदाच्या निवडीबाबत.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत "स्वच्छ सर्वेक्षण २०१८" करिता कंत्राटी तत्वावर आपली निवड **"सिटी को-ऑर्डिनेटर"** म्हणून करण्यात येत आहे. सदर पद पूर्णत: कंत्राटी तत्वावर ठोक परिश्रमिकावरील असल्याने, नियमित शासकीय कर्मचा-यांप्रमाणे कोणत्याही सेवा-सुविधा आपणास अनुज्ञेय असणार नाहीत.

आपली निवड औरंगाबाद विभागातील **घनसांगवी नगरपंचायत** करिता आपण रुजू व्हाल त्या दिनांकापासून ते दि.२८ फेब्रुवारी,२०१८ रोजी पर्यत करण्यात येत आहे. सदर स्थानिक नागरी स्वराज्य संस्थेमध्ये आपण दि.१०/१०/२०१७ पूर्वी रुजू व्हावे. आवश्यकतेनुसार आपल्या पदस्थापनेच्या ठिकाणात बदल केला जाईल.

सदर स्थानिक नागरी स्वराज्य संस्थेमार्फत आपणास दरमहा ठोक परिश्रमिक रु.३०,०००/- (अक्षरी-तीस हजार मात्र) अदा केले जाईल.

आपणास सोबत जोडलेल्या अटी व शर्ती मान्य असल्यास विहीत मुदतीत रुजू व्हावे. रुजू होत असल्याबाबतची तारीख या कार्यालयास ई मेलव्दारे कळवावी. **आपण विहीत मुदतीत रुजू झाला नाहीत, तर आपणास सदर पदी काम करण्यास स्वारस्य नाही, असे समजून आपली निवड रद्द समजण्यात येईल.**

**(सीमा ढमढेरे)**
**कार्यकारी संचालक**

**प्रत :**

१) उपसंचालक, नगरपरिषद प्रशासन विभाग, विभागीय **आयुक्त** कार्यालय, औरंगाबाद.
२) जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरपरिषद शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना.
३) मुख्याधिकारी, नगरपंचायत, घनसांगवी जि. जालना.

## अटी व शर्ती :

I. आपली स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत "स्वच्छ सर्वेक्षण २०१८" करिता कंत्राटी तत्वावर **"सिटी को- ऑर्डिनेटर"** या पदासाठी नियुक्ती रुजू दिनांकापासून ते दि. २८ फेब्रुवारी, २०१८ पर्यत राहील.

II. **"सिटी को-ऑर्डिनेटर"** या पदासाठी आपणास दरमहा रु.३०,०००/- ठोक परिश्रमिक दिले जाईल.

III. आपणास सोपविण्यात आलेल्या कामाचा दरमहा आढावा घेण्यात येईल. त्यानुसार पुढील कालावधीसाठी सेवा सुरु ठेवण्यात येतील.

IV. स्थानिक नागरी स्वराज्य संस्थांमध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण, घनकचरा व्यवस्थापन,इत्यादी संबंधी उत्कृष्ट अंमलबजावणीचे कामकाज आपणास वरिष्ठांनी दिलेल्या सुचनेनुसार व केंद्र/राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार करणे बंधनकारक राहील.

V. अभियानांतर्गत केलेल्या कामाचे दस्ताऐवजीकरण अदयावत करणे तसेच कार्यालयीन कामकाजाकरिता राज्य/विभाग/शहर स्तरावरील विविध बैठकींना उपस्थित राहणे बंधनकारक राहील. त्या अनुषंगाने होणारा प्रवासखर्च व दैनिक भत्ता आपणास राज्य शासनाच्या गट "क" दर्जाच्या कर्मचा-यांच्या वेतनमानास अनुसरुन प्रतिपूर्ती (Reimbursement) स्वरुपात अनुज्ञेय राहील. त्यासाठी विहीत पध्दतीने देयक सादर करणे आवश्यक राहील.

VI. आपणास दरमहा एक रजा अनुज्ञेय राहील. अनुज्ञेय रजेपेक्षा जास्त कालावधीची रजा उपभोगल्यास/गैरहजर राहिल्यास परिश्रमिक त्याअनुषंगाने कपात करण्यात येईल.

VII. आपल्या नियुक्तीचे पद पूर्णतः कंत्राटी तत्वावर ठोक परिश्रमिकावरील असल्याने, नियमित शासकीय सेवेत समायोजनासंबंधी कोणताही दावा आपणास दाखल करता येणार नाही.

VIII. प्रवास करतांना कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास, अपघातासंबंधी कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई या कार्यालयामार्फत अनुज्ञेय राहणार नाही.

IX. आपणास प्राप्त होणारे कागदपत्रे, माहिती व आधार सामुग्रीबाबतची गोपनियता बाळगणे आवश्यक राहील.

X. नियुक्तीच्या कालावधीत वरिष्ठांनी वेळोवेळी सूचवलेली/निर्देशीत केलेली कामे/कर्तव्ये विहीत वेळेत पार पाडावी लागतील.

XI. विहीत कालावधी पूर्वी राजीनामा दयावयाचे असल्यास आपण किमान ३० दिवसांची पूर्वसूचना या कार्यालयास देणे आवश्यक राहील.

XII. आपल्याकडे आवश्यक शैक्षणिक पात्रता व अनुभव नसल्याचे आढळून आल्यास आपली नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

XIII. आपल्यावर कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल असल्यास/झाल्यास आपली नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

XIV. नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपण कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन केल्यास आपली नियुक्ती कोणतेही कारण न देता तात्काळ रद्द करण्यात येईल.

XV. आपले काम समाधानकारक नसल्यास किंवा विशेष परिस्थितीत आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल.